**ठळक बातम्या**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडून आयआयटी मुंबईतल्या कर्करोग उपचार केंद्राचं लोकार्पण

- दुसऱ्या टप्प्यातल्या देशातल्या ८८ लोकसभा मतदारसंघात अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी उमेदवारांची लगबग

- खासदार नवनीत राणा यांचं अनुसुचित जातीचं जात प्रमाणपत्र सर्वोच्च न्यायालयाकडून वैध

**आणि**

- अग्नि प्राइम क्षेपणास्त्राची ओदिशात यशस्वी चाचणी

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज आपल्या मुंबई भेटीत आय आय टी मुंबईत CAR-T सेल उपचार पद्धतीचं लोकार्पण केलं. टाटा मेमोरियल सेंटर आणि आयआयटी मुंबईनं संयुक्तरित्या याची निर्मिती केली आहे. या पद्धतीमुळे कमी कमी खर्चात रुग्णांवर परिणामकारक उपचार शक्य होणार आहे. यावेळी राज्यपाल रमेश बैस, आयआयटी मुंबईचे संचालक सुभाशिष चौधरी यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत आज संपणार आहे. या टप्प्यात १२ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या ८८ लोकसभा मतदारसंघांमधे निवडणूक होणार आहे. राज्यातल्या बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, हिंगोली, नांदेड आणि

परभणी या ८ लोकसभा मतदारसंघात दुसऱ्या टप्प्यात मतदान होणार आहे. या सर्व मतदारसंघात उमेदवारी अर्ज भरण्यासाठी उमेदवारांची लगबग सुरू आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज **हिंगोलीत** महायुतीच्या उमेदवाराचा अर्ज भरण्यासाठी दाखल झाले आहेत.

**अमरावतीमध्ये** भाजपा उमेदवार नवनीत राणा यांनी अर्ज भरण्यापूर्वी सभा झाली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यावेळी उपस्थित होते.

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी अर्ज भरण्यापूर्वी **अकोल्यात** मतदारांशी संवाद साधला.

**नांदेडमध्ये** भाजपा उमेदवार प्रतापराव पाटील चिखलीकर अर्ज दाखल करायला गेले तेव्हा माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण उपस्थित होते. वंजित बहुजन आघाडीचे उमेदवार अविनाश भोसीकर यांनीही नांदेडमधून आज अर्ज भरला.

**<><><><><>**

अमरावतीच्या खासदार नवनीत राणा यांचं अनुसूचित जातीचं जात प्रमाणपत्र सर्वोच्च न्यायालयानं वैध ठरवलं आहे. जात प्रमाणपत्र पडताळणी समितीनं पुरेशा कागदपत्रांची तपासणी करुन त्यांचं जात प्रमाणपत्र वैध ठरवलं आहे. त्यामुळं त्यात कोणाच्याही हस्तक्षेपाची गरज नसल्याचं स्पष्ट मत न्यायमूर्ती जे के माहेश्वरी आणि संजय करोल यांच्या खंडपीठानं नोंदवलं.

माजी खासदार आनंदराव अडसूळ आणि सुनिल भालेराव या नेत्यांनी राणा यांच्या जात प्रमाणपत्रावर आक्षेप घेणाऱ्या याचिका २०१७ मध्ये दाखल केल्या होत्या. राणा यांनी निवडणूक अर्ज दाखल करताना अनुसूचित जमातीबाबत दिलेले प्रमाणपत्र बोगस आहे. जात प्रमाणपत्र समितीसमोरही त्यांनी खोटा जातीचा दाखला दिलेला आहे, असा आरोप या याचिकांच्या माध्यमातून करण्यात आला होता.

त्यावर राणा या शिख-चामार जातीतल्या आहेत. महाराष्ट्रातली मोची किंवा चांभार ही जात यापेक्षा वेगळी असल्याचं निरीक्षण नोंदवत मुंबई उच्च न्यायालयानं त्यांचं जात प्रमाणपत्र अवैध ठरवलं होतं. त्याला राणा यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. शिख-चांभार यातला शिख हा शब्द धर्मवाचक असल्याचा दावा राणा यांनी केला होता.

**<><><><><>**

काँग्रेस नेते आणि मुंबई काँग्रेसचे माजी अध्यक्ष, संजय निरूपम यांची काँग्रेस पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. पक्षविरोधी वक्तव्यं आणि शिस्तभंगांच्या तक्रारीनंतर पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी निरूपम यांना काँग्रेस पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबित करण्याचा निर्णय घेतल्याचं काँग्रेसचे सरचिटणीस के.सी.वेणुगोपाल यांनी काल प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे. दरम्यान, यापूर्वीच पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिलेला आहे. उत्तर - पश्चिम मुंबई मतदार संघातून निवडणूक लढवणार असल्याचं संजय निरुपम यांनी आज जाहीर केलं आहे.

**<><><><><>**

काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते गौरव वल्लभ यांनी आज पक्षाच्या सर्व पदांचा राजीनामा दिला आहे. आज काँग्रेस पक्ष ज्या दिशाहीन मार्गाने वाटचाल करत आहे, त्यामुळे पक्षात राहण्याची ईच्छा होत नाही, असं वल्लभ यांनी पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांना लिहिलेल्या त्यांच्या राजीनामा पत्रात म्हटलं आहे. थोड्याच वेळापूर्वी वल्लभ यांनी भाजपात प्रवेश केला आहे.

**<><><><><>**

भारतीय निवडणुक आयोगानं शासकीय कर्मचारी पोस्टल बॅलेटद्वारे मतदान करू शकत नसल्याच्या अफवा खोट्या असल्याचं सामाजिक माध्यमांद्वारे स्पष्ट केलं आहे. निवडणुकांच्या दरम्यान कार्यरत कर्मचारी नियुक्त मतदार सुविधा केंद्रावर

पोस्टल बॅलेटद्वारे मतदान करू शकतात. त्यामुळं अशा अफवांकडे दुर्लक्ष करावं आणि खात्रीशीर माहितीसाठी निवडणूक आयोगाच्या संकेतस्थळाला भेट देण्याचं आवाहन निवडणूक आयोगानं केलं आहे.

<><><><>

काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांनी आज राज्यसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांनी त्यांना शपथ दिली. सोनिया गांधी राजस्थानमधून राज्यसभेवर निवडून आल्या आहेत.

<><><><>

अग्नि प्राइम क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी काल ओदिशाच्या किनारपट्टीवरील डॉ. एपीजे अब्दुल कलाम बेटावरून घेण्य़ात आली. ही चाचणी यशस्वी झाल्याबद्दल केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी संरक्षण संशोधन आणि विकास संस्था, स्ट्रॅटेजिक फोर्सेस कमांड आणि सशस्त्र दलांच अभिनंदन केलं आहे. जमीनीवरून हवेत मारा करणाऱ्या अग्नी प्राइम या क्षेपणास्त्रानं आवश्यक त्या सर्व चाचण्या पूर्ण केल्या असल्याची माहितीही संरक्षण मंत्रालयानं दिली आहे.

<><><><>

औषधांच्या किंमतीमध्ये भरघोस वाढ झाल्याचा दावा खोटा आणि दिशाभूल करणारा असल्याचं केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. औषधनिर्माण विभागाअंतर्गत राष्ट्रीय फार्मास्युटिकल प्राइसिंग ऑथोरिटी दरवर्षी काही औषधांच्या घाऊक किंमतीत निर्देशांकाच्या आधारे सुधारणा करते. त्यानुसार ७८२ औषधांच्या मर्यादित किंमतीमध्ये कोणताही बदल होणार नसून ५४ औषधांच्या किंमतीमध्ये एक पैसा इतकी कमी वाढ होणार असल्याचं मंत्रालयानं सांगितलं आहे.

<><><><>

जम्मू इथल्या राजभवनात श्री माता वैष्णोदेवी श्राइन बोर्डाची ७२ वी बैठक नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत यापूर्वी घेण्यात आलेल्या विविध निर्णयांचा आणि विकासकामांचा आढावा घेऊन सविस्तर चर्चा झाली. त्याबरोबरच यात्रेकरूंच्या सोयीसुविधांमध्ये वाढ करण्यासाठी २७ बाबींना तत्वत मान्यता देण्यात आली असून विविध नवीन प्रकल्पांनाही यावेळी मंजुरी दिली.

<><><><>

दहशतवादाच्या धोक्याचा सामना करण्यासाठी दुटप्पीपणा टाळण्याचे आवाहन राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी केलं आहे. ते काल कझाकस्तानमधल्या अस्ताना इथं शांघाय सहकार्य संघ्रटनेच्या सुरक्षा परिषदेला संबोधित करत असताना त्यांनी आपलं मत मांडलं. सीमेपलीकडील दहशतवादी कारवायांमध्ये सामील असलेल्यांसह दहशतवादाच्या गुन्हेगारांवर प्रभावीपणे आणि त्वरीत कारवाई केली पाहिजे, असंही ते म्हणाले.

<><><><>

तैवानच्या पूर्व किनारपट्टीलगत काल सकाळी झालेल्या ७ पूर्णांक ४ दशांश रीक्टर स्केलच्या भूकंपाला बळी पडलेल्या तैवानी नागरिकांची संख्या ९ पर्यंत पोचली आहे. त्या व्यतिरिक्त हजार पेक्षा अधिक नागरिक जखमी झाले आहेत. या भूकंपाची झळ डोंगराळ प्रदेशासह तैवानची राजधानी असलेल्या तैपेयी शहरालाही बसली. या भूकंपामुळे मोठ्या प्रमाणात भूस्खलन झालं असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या भूकंपाच्या तडाख्यात  सापडलेल्या शंभरेक नागरिकांचा  शोध घेण्याची मोहीम अद्याप सुरु आहे. गेल्या २५ वर्षांतला हा सगळ्यात शक्तीशाली भूकंप असल्याचं स्थानिक प्रशासनानं म्हटलं आहे.

दरम्यान या भूकंपामुळं जपान आणि फिलीपीन्स देशांच्या आसपास सुनामी लाटा उसळण्याची शक्यता वर्तवण्यात आली होती, नंतर ही शक्यता मावळली.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज गुजरात टायटन्सची पंजाब किंग्जशी लढत होणार आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरू होईल. दरम्यान काल झालेल्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सनं दिल्ली कॅपिटल्सचा १०६ धावांनी पराभव केला. कोलकातानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला होता. कोलकातानं २० षटकात ७ बाद २७२ धावा केल्या. ही आयपीएलच्या इतिहासातील दुसरी सर्वोच्च धावसंख्या ठरली. २७३ धावांचं लक्ष गाठताना दिल्ली कॅपिटल्सचा डाव १७ षटक २ चेंडूत सर्वबाद १६६ धावांत आटोपला.  कोलकाताचा सुनील नरेन हा सामनावीर ठरला.

**<><><><><>**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण भंडारा-गोंदिया लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**//<><><><><>//**